सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र.३/का-११
१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र.२२८७६२२६,
ई-मेल sec.polparty@mah.gov.in
दिनांक: २९ मे २०२५

प्रति,
श्री. नामदेव निवृत्ती जाधव,
अध्यक्ष, सनय छत्रपती शासन,
२०४, दुसरा मजला, आशिष प्लाझा, सेक्टर नं.२७- ए,
एसडीसी प्लॉट नं. १, निगडी प्राधिकरण, पुणे- ४११ ०४४.

**विषय: 'सनय छत्रपती शासन' या राजकीय पक्षाच्या नोंदणीचे पत्र.**

महोदय,

'सनय छत्रपती शासन' यांच्या वतीने पक्षाचे अध्यक्ष श्री. नामदेव निवृती जाधव, यांनी राजकीय पक्षाच्या नोंदणीसाठी दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजीचा विनंती अर्ज जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दि. २८ जानेवारी, २०२५ च्या पत्रान्वये राज्य निवडणूक आयोगास दि. ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी प्राप्त झाला होता.

२. 'सनय छत्रपती शासन' हा पक्ष राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्यापूर्वी सर्वसामान्य जनतेकडून पक्षाच्या नोंदणीबाबत दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून हरकती मागविण्यात आल्या होत्या.

३. ॲड. विवेक ठाकरे यांनी त्यावर दि. १९ मार्च २०२५ रोजीच्या पत्रान्वये हरकत दाखल केली होती. त्यावर पक्षाने आपल्या दि. १५ एप्रिल २०२५ च्या पत्रान्वये म्हणणे सादर केले होते. ॲड. ठाकरे व पक्षाला आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २२ मे २०२५ रोजी मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्यासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यातून पुढील बाबी स्पष्ट होतात:

(क) भारत निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या भाग-२९अ अंतर्गत यापूर्वीच दि. २५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पत्रान्वये 'सनय छत्रपती शासन' या राजकीय पक्षाची नोंदणी केली आहे.

(ख) भारत निवडणूक आयोगाने 'शासन' या शब्दाचा समावेश असलेल्या नावाच्या विविध राजकीय पक्षांचीदेखील यापूर्वीच नोंदणी केली आहे.

(ग) महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत 'सनय छत्रपती शासन' या पक्षाकडून ४ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती.

(घ) 'The Emblems and Names (Prevention of Improper Use) Act, 1950' नुसार काही मानचिन्हांच्या आणि नावांच्या अयोग्य वापरास प्रतिबंध करण्यात आला आहे. या अधिनियमाच्या अनुसूचिमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज' या नावाचाही समावेश आहे. त्याहून 'सनय छत्रपती शासन' हे नाव वेगळे आहे.

(ङ) 'सनय छत्रपती शासन' या नावाचा एकत्रित विचार केल्यास ते सामान्य (Generic) नाव नाही. त्यामुळे मतदारांची दिशाभूल होण्याची शक्यता नाही.

Scanned with OKEN Scanner

४.	वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, ॲड. ठाकरे यांची हरकत फेटाळण्यात आली आहे. त्याचबरोबर पक्षाने आपल्या मूळ अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे, निवेदने व माहिती आणि जोडलेल्या पुराव्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाच्या ***'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ०५ मे २०२५'*** या आदेशानुसार 'सनय छत्रपती शासन' या राजकीय पक्षाची नोंदणी करण्यात येत आहे.

५.	ही नोंदणी फक्त महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समिती निवडणुकांसाठी आहे. यापुढे आपल्या पक्षाच्या नावामध्ये कोणताही बदल करावयाचा झाल्यास, त्यासाठी आयोगाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

६.	'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' आणि इतर आदेशांचे; तसेच ज्य निवडणूक आयोग वेळोवेळी देईल अशा निर्देशांचे पालन करणे पक्षावर बंधनकारक राहील.

७.	आपणास कळविण्यात येते की, सहा महिन्यांच्या आत आपल्या पक्षाच्या नावाने आयकर विभागाकडून पॅन कार्ड (PAN) मिळवून त्याची प्रमाणित प्रत राज्य निवडणूक आयोगास सादर करावी; तसेच पक्षाच्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत व संबंधित वर्षाचे विवरण (रिटर्न) सादर केल्याची प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यापासून सात महिन्यांच्या आत आयोगास सादर करण्यात यावी.

८.	भविष्यात आपला पक्ष विसर्जित करण्यात आल्यास, किंवा पक्ष अन्य पक्ष/ आघाडी यामध्ये विलीन करण्यात आल्यास तसे राज्य निवडणूक आयोगास ताबडतोब कळविण्याची जबाबदारी पक्षाचे अध्यक्ष/ सचिव यांची राहील.

९.	राजकीय पक्षांच्या झेंड्यासंबंधी कोणतीही बाब राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत येत नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

१०.	'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' या आदेशातील परिच्छेद ७(६) मध्ये नमूद तरतुदीनुसार 'सनय छत्रपती शासन' या राजकीय पक्षाचा कायम नोंदणी क्रमांक SEC/UPP/SCS/2025/07 असा राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(डॉ. जगदीश मोरे)
सहायक आयुक्त (जनसंपर्क),
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित:**

१. विभागीय आयुक्त, सर्व विभागीय आयुक्तालय,
२. महानगरपालिका आयुक्त, सर्व महानगरपालिका कार्यालय,
३. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
४.मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद कार्यालय,
५. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती कार्यालय,
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी,
७. ॲड. विवेक ठाकरे, मुंबई.
७. निवड नस्ती (कार्यासन-११).

Scanned with OKEN Scanner